जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER

दैनिक | वर्ष १ | अंक २१८ | बुधवार, ४ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210

## संक्षिप्त

### दौंड तालुक्यात रस्त्याच्या वादातून वकिलाला मारहाण

**दौंड, ता. ३ :** रस्त्याच्या वादातून एका वकिलाला ७ जणांनी मारहाण केल्याची घटना घडली दौंड तालुक्यातील हिंगणीबेर्डी येथे घडली आहे. याप्रकरणी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बुधवारी (ता. २५) दुपारी एक वाजण्याच्या सुमारास हिंगणीबर्डी, ता. दौंड, जि. पुणे गावच्या हद्दीत जमीन गट नंबर १५०, १५१ मधील रस्त्यावर हि घटना घडली. याप्रकरणी माऊली बबन वाळके (वय ३१, व्यवसाय (वकील) रा. हिंगणीबेर्डी, ता. दौंड) यांनी दौंड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार उत्तम बाबुराव मचिंदर, बंकट दत्त मचिंदर, अमोल उत्तम मचिंदर, सुभाष दादा मचिंदर, पोपट चांगदेव मचिंदर, चांगदेव बाबुराव मचिंदर, स्वप्निल सुभाष मचिंदर सर्व रा हिंगणीबेर्डी, ता. दौंड) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी दुपारी हिंगणीबेर्डी, गावच्या हद्दीत जमीन गट नंबर १५०, १५१ मधील रस्त्याच्या वादातून वरील आरोपींनी बेकायदेशीर जमाव करून वकील माऊली वाळकेयांना हाताने व लाथाबुक्यांनी मारहाण करून शिवीगाळ दमदाटी केली. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली.

# वाघोलीत १८ ते २२ मार्चदरम्यान ६८ वी महाराष्ट्र केसरी स्पर्धा

## विजेत्याला मिळणार आलिशान फॉर्च्युनर तर उपविजेत्याला मिळणार स्कॉर्पिओ एन कार

## आयोजक रामकृष्ण सातव यांची माहिती

**वाघोली, ता. ३ :** आजच्या वासापूजन व मातीपूजन समारंभाचे आयोजन रामकृष्ण सातव पाटील यांनी एवढे भव्य आणि मोठे केले आहे, यावरूनच समजते की स्पर्धा सुद्धा अतिशय भव्यदिव्य असेल. स्व. मामासाहेब मोहोळ यांनी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या माध्यमातून ही स्पर्धा सुरू केली. ही स्पर्धा सुरू करण्यामागे या स्पर्धेच्या माध्यमातून कुस्तीपटूंनी मोठी कामगिरी करून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचावे असे प्रतिपादन केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले.

महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने रामकृष्ण सातव पाटील आयोजित ६८ वी महाराष्ट्र केसरी २०२५ -२६ वाघोली, पुणे या ठिकाणी १८ ते २२ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी वासापूजन व मातीपूजन समारंभ सोमवारी (ता. ०२) सकाळी दहा वाजता पार पाडला. यावेळी मोहोळ बोलत होते. रामकृष्ण अण्णा सातव पाटील आणि समस्त ग्रामस्थ व पंचक्रोशी यांनी आयोजित केलेल्या या स्पर्धेमध्ये महाराष्ट्र केसरीच्या इतिहासात प्रथमच महाराष्ट्र केसरी विजेता पैलवानास टोयोटा फॉर्च्यूनर गाडी आणि उपमहाराष्ट्र केसरी पैलवानाला स्कार्पिओ एन गाडी किताब म्हणून देण्यात येणार आहे. या गाडीचे अनावरण सुद्धा यावेळी मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, सरचिटणीस योगेश दोडके, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक प्रदीप कंद, आमदार बापूसाहेब पठारे, पुणे मनपा नगरसेवक रामदास दाभाडे, नगरसेवक अनिल सातव, रत्नमाला सातव, श्रेयस खांदवे, तसेच मंगलदास बांदल, वाघोलीचे माजी उपसरपंच राजेंद्र सातव, संजय सातव, महाराष्ट्र केसरी दत्ता गायकवाड, सईद चाऊस, मल्ल सम्राट अस्लम काझी, किरण भगत, अभिजित कटके, नटराज सातव, काकासाहेब सातव, राहुल सातव, जिल्हा परिषद सदस्य किरण साकोरे, पंचायत समिती सुदर्शन चौधरी, सदस्य कुशल सातव, कृषीराज चौधरी, सुषमा मुरकुटे, सुनील चाचा जाधवराव, अजिंक्य कांचन, भाजपा पुणे शहर चिटणीस केतन जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.यापुढे बोलताना मोहोळ म्हणाले, मला आयोजकांचे कौतुक वाटते की सर्व जिल्हा कुस्ती संघाकडून, सर्व जिल्ह्यातून याठिकाणी माती आणून तिचे पूजन करण्यात आले आणि त्यामाध्यमातून स्पर्धेच्या आखाड्याची निर्मिती होणार आहे. या स्पर्धेचे आयोजन करताना आयोजक रामकृष्ण सातव यांनी ही स्पर्धा सर्वोत्तम झाली पाहिजे, तिचे आयोजन सर्वोत्कृष्ट असेल, ही त्यामागील त्यांची भावना आहे, ही गोष्ट खरंच कौतुकास्पद आहे. या समारंभाच्या माध्यमातून त्यांनी आज एकप्रकारे ट्रलर दाखवला आहे, त्यामुळे पिक्चर नक्कीच मोठा असणार आहे. आजवर कधीही एवढी भव्य महाराष्ट्र केसरी झाली नाही, अशी भव्य महाराष्ट्र केसरी स्पर्धा यावेळी होईल.

याकार्यक्रमाच्यास्पर्धेचे आयोजक रामकृष्ण सातव पाटील म्हणाले, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष रामदास तडस, केंद्रीय राज्यमंत्री व कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष मुरलीधरजी मोहोळ व कुस्तीगीर संघातील सर्वांचे मी समस्त वाघोली ग्रामस्थ व पंचक्रोशीच्या वतीने आभार व्यक्त करतो, त्यांनी आम्हाला महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या आयोजनाची संधी दिली. सदर स्पर्धेचे आजवर महाराष्ट्रात झाले नसेल असे भव्य आणि नियोजनपूर्ण आयोजन आम्ही करून दाखवू. या स्पर्धेच्या माध्यमातून राज्यातील कुस्तीपटूंना पाठबळ मिळावे, कुस्तीला ताकद मिळावी, यासाठी आम्ही चांगल्या प्रकारची बक्षिसे देत आहोत. आपण सर्वजण मिळून आपल्या लाल मातीतल्या कुस्तीला मोठे करूया आणि यामाध्यमातून आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुस्तीपटू घडविण्यासाठी प्रयत्नशील राहूया.

### मुख्यमंत्री फडणवीस उपस्थित राहणार

महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या क्रीडानगरीला दिवंगत नेते व महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा अनंतराव पवार यांचे नाव दिल्याचे मोहोळ यांनी जाहीर केले. तसेच त्यांच्या निधनाने क्रीडा क्षेत्राची हानी झाल्याचे नमूद केले. रामकृष्ण अण्णा सातव पाटील आणि समस्त ग्रामस्थ व पंचक्रोशी येथील नागरिकांनी आयोजित केलेल्या स्पर्धेचे त्यांनी कौतुक केले. या स्पर्धेच्या बक्षिस वितरण समारंभाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी (ता. २२) उपस्थित राहणार असल्याची माहिती ही यावेळी मोहोळ यांनी यावेळी दिली.

# प्रेमी युगलाला लुटणाऱ्या तिघांना अटक बारामती तालुका पोलिसांची कारवाई

**बारामती, ता. ३ :** बारामतीतील तांदुळवाडी येथे एलसी कंपनी लेक परिसरात एका तरुणावर कोयत्याने वार करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांना बारामती ग्रामीण पोलिसांकडून अटक करण्यात आली आहे. अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांनी दिली.

प्रसाद गणपत भोसले (वय २४), धैर्यशील प्रशांत आगवणे (वय १९) व कृष्णा नाना गाडेकर (वय २१, सर्व रा. तांदुळवाडी, ता. बारामती) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींकडून ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २६ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक येथील मोकळ्या जागेत फिर्यादी हे त्यांच्या मैत्रिणीसोबत बसले होते. त्यावेळी तोंडाला मास्क व रुमाल बांधलेल्या तिघांनी त्यांच्या जवळ येत लोखंडी सत्तूर व कोयत्याचा धाक दाखवून पैशांची मागणी केली.

विरोध केल्यावर एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायावर वार करून त्यांना जखमी केले. त्यानंतर आरोपींनी सोन्याचे व चांदीचे दागिने व २ हजार रुपये रोख असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जबरदस्तीने काढून घेतला. पुन्हा येथे येऊ नका अशी धमकी देत आरोपी तेथून पसार झाले होते. याबाबत बारामती तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर घटनेचा पोलीस तपास करींत असताना गोपनीय माहितीच्या आधारे वरील आरोपी यांना २८ फेब्रुवारी रोजी अटक करण्यात आली. न्यायालयाने त्यांना चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. चौकशीदरम्यान आरोपींकडून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, पोलीस उपनिरीक्षक युवराज पाटील तसेच पोलीस अंमलदार सुरेंद्र वाघ, भारत खारतोडे, मनोज पवार, जितेंद्र शिंदे, राजू बन्ने आणि पथकाने केली.

# २२ लाखांचे मुद्रांक शुल्क बुडविल्याप्रकरणी यवत येथील ५ जणांना सुनावणीचे आदेश

लोणी काळभोर, ता. ३ : आळंदी (पुणे) येथील जमिनीच्या विक्रीसाठी आकस्मिक करार या नोंदणीकृत दस्ताची नोंदणी इंदापूर येथील सह-दुय्यम निबंधक कार्यालयात करण्यात आली आहे. या करारामध्ये २२ लाख १७ हजार ३३० रुपयांचे मुद्रांक शुल्क कमी भरल्याचे निदर्शनास आले असून त्यामुळे शासनाच्या तिजोरीला आर्थिक 'टका बसल्याचे स्पष्ट झाले आहे. या प्रकरणी लिहून देणारे, लिहून घेणारे तसेच मान्यता देणारे अशा एकूण सहा जणांना ९ मार्च रोजी होणाऱ्या सुनावणीस हजर राहण्याचे आदेश पुणे ग्रामीणचे मुद्रांक जिल्हाधिकारी तथा सह-जिल्हा निबंधक प्र. श. देशपांडे यांनी दिले आहेत.

या प्रकरणात कलावती रामचंद्र दोरगे ऊर्फ कलावती रामभाऊ शेलार (रा. यवत, ता. दौंड, जि. पुणे) या लिहून देणाऱ्या आहेत. तर शिगोना अभिजित भंसाली (रा. ५, शगुफा सोसायटी, पाम बीच रोड, सेक्टर ५८-२, सीवूड्स, नवी मुंबई), अशोक रामचंद चोरघे, नितेश अशोक चोरघे आणि नितीन अशोक चोरघे हे चौघे लिहून घेणारे आहेत. तसेच सागर अशोक दोरगे (सर्व रा. मौजे यवत, ता. दौंड, जि. पुणे) यांनी या व्यवहारास मान्यता दिली आहे. संबंधित सर्वांना सुनावणीस उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

इंदापूर येथील सह-दुय्यम निबंधक कार्यालयात ८ जानेवारी २०२६ रोजी विक्रीसाठी आकस्मिक करार या प्रकारचा करारनामा नोंदविण्यात आला. या दस्तामध्ये मौजे आळंदी (ता. खेड, जि. पुणे) येथील सर्वे क्रमांक ९१/१ व इतर गटांतील १/३ अविभक्त हिस्सा असलेल्या जमिनीचा व्यवहार नमूद करण्यात आला आहे.

सहायक नगररचनाकार यांनी केलेल्या पुनर्मूल्यांकनानुसार मिळकतीचे एकूण मूल्य १२ कोटी ६९ लाख ५५ हजार ५०० रुपये इतके निश्चित करण्यात आले. त्यानुसार आवश्यक मुद्रांक शुल्क ७६ लाख १७ हजार ३३० रुपये असणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात केवळ ५४ लाख रुपये शासनजमा करण्यात आल्याचे आढळले. याबाबत गणेश घाडगे यांनी १६ जानेवारी २०२६ रोजी ई-मेलद्वारे तक्रार केली होती.

प्राथमिक तपासात संबंधित दस्तास आवश्यक झोन दाखले जोडले नसल्याचे आढळून आले. त्यानंतर संबंधितांकडून झोन दाखले मागविण्यात आले. पुढे २४ फेब्रुवारी २०२६ रोजी संबंधितांना नोटीस बजावण्यात आली. तपासाअंती या करारात २२ लाख १७ हजार ३३० रुपयांचे मुद्रांक शुल्क कमी भरल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट झाले आहे.

दरम्यान, नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वानुसार संबंधितांना आपले म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली आहे. सोमवार, ९ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता सुनावणी निश्चित करण्यात आली आहे.

संबंधित किंवा त्यांचा अधिकृत प्रतिनिधी आवश्यक कागदपत्रांसह (झोन दाखला, मोजणी नकाशा आदी) उपस्थित राहिला नाही, तर उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे एकतर्फी निर्णय घेतला जाईल, असा इशारा सह-जिल्हा निबंधक प्र. श. देशपांडे यांनी दिला आहे. त्यामुळे शासनाच्या तिजोरीला फटका बसविणाऱ्या संबंधितांवर पुढे कोणती कारवाई होते, हे ९ मार्चच्या सुनावणीनंतर स्पष्ट होणार आहे.

# शासकीय वैद्यकीय सर्वोपचार रूग्णालय व मेडदच्या आयुर्वेद महाविद्यालयास अजितदादांचे नाव

**बारामती, ता. ३ :** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न सर्वोपचार रुग्णालय तसेच मेडद येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाला दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे नाव देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून यासंदर्भातील अधिसूचना सोमवारी (ता. ०२) जारी करण्यात आली.



यापूर्वीप्रमाणे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय हे नाव कायम राहणार आहे. मात्र, या महाविद्यालयाअंतर्गत असलेल्या सर्वोपचार रुग्णालयाचे नामकरण स्व. अजितदादा पवार सर्वोपचार रुग्णालय असे करण्यात येणार आहे. तसेच मेडद येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचेही स्व. अजितदादा पवार शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालय असे नामकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

या दोन्ही संस्थांच्या उभारणीत अजित पवार यांचे मोलाचे योगदान असल्याचे शासनाच्या आदेशात नमूद करण्यात आले आहे. संकल्पनेपासून प्रत्यक्ष उभारणीपर्यंत त्यांनी वारंवार भेटी देऊन सूचना केल्या होत्या. या प्रकल्पांमुळे केवळ बारामतीच नव्हे, तर पुणे, सातारा, सोलापूर आणि अहिल्यानगर जिल्ह्यांतील रुग्णांना मोठा दिलासा मिळाला आहे. शासकीय दरात तपासण्या, शस्त्रक्रिया तसेच सीटी स्कॅन आणि एमआरआयसारख्या सुविधा उपलब्ध झाल्या आहेत.

आदेशात असेही नमूद करण्यात आले आहे की, उपमुख्यमंत्री तसेच वित्तमंत्री म्हणून कार्यरत असताना अजित पवार यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात आरोग्य क्षेत्राला विशेष प्राधान्य दिले. जिल्हास्तरीय वैद्यकीय पायाभूत सुविधा मजबूत करणे, नवीन वैद्यकीय व आयुर्वेद महाविद्यालये सुरू करणे, आधुनिक उपकरणांची उपलब्धता वाढविणे आणि ग्रामीण भागात तृतीयस्तरीय आरोग्यसेवा विस्तारण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारामुळे बारामती परिसरातील आरोग्य आणि शैक्षणिक विकासाला गती मिळाल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

# भवरापूर येथे जमिनीच्या वादातून चुलत भावाचा गाडीखाली चिरडून खून

## पोलिसांकडून दोन आरोपींना अटक

**उरुळी कांचन, ता. ३ :** शेतीच्या जुन्या वादातून तसेच नदीवरील सामाईक मोटार दुरूस्तीचे कारणावरून भरदिवसा कारने मोटार सायकलला जोरदार धडक देत सख्ख्या चुलत भावाचा चुलत भावाने खून केल्याची धक्कादायक घटना घडली. उरुळी कांचन-भवरापूर मार्गावरील साठे वस्ती परिसरात सोमवारी (ता. ०२) दुपारी पाऊणे चार वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. याप्रकरणी दोघांना उरुळी कांचन पोलिसांनी ताब्यात घेतले असल्याची माहिती उरुळी कांचन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन वांगडे यांनी दिली.

महेश लक्ष्मण साठे (वय-३२, व्यवसाय शेती, रा. भवरापूर, ता. हवेली) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. तर अक्षय दशरथ साठे (वय ३२, रा. भवरापूर ता. हवेली), व गोकुळ नाना कोकरे (वय २३, रा. आष्टापूर ता. हवेली) असे ताब्यात घेण्यात आलेल्या दोघांची नावे आहेत. याप्रकरणी मयत महेशचे वडील लक्ष्मण सोपान साठे (वय ५८, रा. भवरापूर, ता. हवेली) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भवरापूर येथील जमीन गट क्रमांक १०४ संदर्भातील जुना वाद तसेच सामाईक नदीवरील मोटार दुरुस्तीच्या कारणावरून सोमवरी दुपारी पाऊणे चार वाजण्याच्या सुमारास महेश साठे हे



झालेल्या वादाची तक्रार देण्यासाठी उरुळी कांचन पोलीस स्टेशनला गेले होते. त्यावेळी पोलीसांनी महेश साठे ला वैद्यकीय तपासणी उरुळी कांचन येथे तपासणीसाठी पाठवले होते.

मयत महेश साठे हे आपल्या हिरो होंडा पॅशन मोटारसायकलवरून जात असताना आरोपींनी त्यांच्या हुंदाई आय-२० कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. ही धडक जाणीवपूर्वक देऊन जीवे ठार मारण्याच्या उद्देशानेच खून केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, आरोपी अक्षय साठे याच्यावर यापूर्वी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात आयपीसी कलम २७९, ३३७, ३३८ तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४, १३४/१७७ अंतर्गत गुन्हा दाखल असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक प्रविण कांबळे करीत आहेत. घटनेमुळे भवरापूर परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मयत महेश साठे यांच्या पश्चात आई वडील, भाऊ, पत्नी, व चार वर्षाचा मुलगा असा परिवार आहे.

### पंधरा दिवसांपूर्वी एनसी दाखल

सख्खा चुलत भावाला बेदकारपणे कारने धडक देऊन खून घडवून आणणारा अक्षय साठे याने परिसरात दादागिरी करणे, मारामारी करणे अशी चर्चा परिसरात होती. दादागिरीच्या बळावरच त्याने चुलत भाऊ महेश व त्यांच्या कुटूंबावर दहशत माजवित होता. यापूर्वी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात त्याच्या विरुद्ध जमीनीच्या वादातून मारहाणीचा गुन्हा दाखल आहे. तर गेल्या पंधरा दिवसांपूर्वी उरुळी कांचन पोलिस ठाण्यात त्याच्याविरोधात एनसी दाखल झाली आहे.

## संक्षिप्त



### धनंजय मुंडेंना मोठा दिलासा; अंजली दमानियांचे सर्वच आरोप लोकायुक्तांनी फेटाळले

**बीड, ता. ३ :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आमदार धनंजय मुंडे यांना आणखी एका न्यायालयीन लढ्यात यास आलय. कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट यासह वेगवेगळ्या आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांचे सर्व आरोप राज्य लोक आयुक्तांनी फेटाळून लावले आहेत. धनंजय मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी योजनेंतर्गत विशेष कृती कार्यक्रम राबवून त्याअंतर्गत नॅनो खते, कापूस बॅग, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आदी साहित्य खरेदी करण्यात आली. त्यामध्ये अनियमितता करून शेकडो कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. या संदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या बाजूने निकाल दिला व संबंधितांचे आरोप फेटाळून लावल्यानंतर अंजली दमानिया यांनी राज्य लोक आयुक्तांकडे याबाबत तक्रार केली होती.

### केंद्रीय गृह मंत्रालयाकडून सर्व राज्यांना पत्र

**नवी दिल्ली, ता. ३ :** इराणविरुद्ध इस्त्रायल-अमेरिका यांच्यातील युद्धामुळे मध्य पूर्वेतील तणाव वाढलाय. अमेरिका- इस्त्रायल तेहरानसह अनेक बड्या शहरात सातत्याने बॉम्ब हल्ले करत आहे. तेहरानमध्ये सर्वात जास्त नुकसान झाल्याचे दिसून येते. दरम्यान , या युद्धाचे पडसाद हे भारतावरही पडण्याची शक्यता लक्षात घेता केंद्र सरकार सतर्क झालंय. त्यासाठी केंद्रीय गृह मंत्रालयाकडून सर्व राज्यांना पत्र पाठवण्यात आलंय. यामध्ये इराणवर अमेरिका आणि इस्त्रायल हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर भारतात संभाव्य हिंसाचारापूर्वी सतर्क राहा. २८ फेब्रुवारीला हे पत्र प्रसिद्ध करण्यात आलं होतं. ज्यात राज्यांना भडकाऊ भाषण देणाऱ्या इराणी कट्टर समर्थकांची ओळख पटवा असं सांगितलं होतं. या पत्रात मध्य पूर्व आशियात सुरू असणाऱ्या युद्धानंतर भारतातील अनेक भागात होणाऱ्या विरोध प्रदर्शनाबाबत सतर्क केले आहे. कायदा सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजनाबाबतही पत्रात उल्लेख करण्यात आला आहे.

### फुकटचा केक घेण्यासाठी टोळक्याची दहशत

**पिंपरी, ता. ३ :** केकचे पैसे मागितल्याच्या रागातून दुकानात दहशत माजवत दोन हजार रुपये हिसकावून घेतले. तसेच कोयत्याचा धाक दाखवत दहशत निर्माण केली. याप्रकरणी तीन जणांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना पिंपळे सौदागर येथील एका बेकरीत घडली.आदित्य मानवतकर याला पोलिसांनी अटक केली आहे. नौशाद मुख्तार अहमद (४२,जगताप नगर, पिंपळे सौदागर) यांनी याबाबत सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गुरुवारी रात्री सव्वा अकरा वाजताच्या सुमारास तीनही आरोपी फिर्यादी यांच्या बेकरीत आहे. आरोपींनी केक घेऊन पैसे न देता निघण्याचा प्रयत्न केला. पैसे मागितल्यावर आरोपींनी फिर्यादीच्या शर्टाच्या खिशातून दोन हजार रुपये काढून घेतले. तसेच कोयता दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. सांगवी पोलीस तपास करत आहेत.

### विवाह संकेतस्थळावर खोटे प्रोफाइल तयार करून महिलेची फसवणूक

**पिंपरी, ता. ३ :** विवाह संकेतस्थळावर खोटे प्रोफाइल तयार करून एका महिलेकडून ४२ लाख ६४ हजार ३२ रूपये घेतले. सायबर क्राइम पोर्टलवर तक्रार केल्यावर महिलेला काही रक्कम परत मिळाली. मात्र चोरट्याने २७ लाखांची फसवणूक केली. ही घटना ताथवडे येथे २७ नोव्हेंबर २०२४ ते ३० जानेवारी २०२५ रोजी घडली. याबाबत पिडित महिलेने वाकड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील एका विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने खोट्या नावाने विवाह जुळविणाऱ्या संकेतस्थळावर आपली नाव नोंदणी केली होती. त्याने पिडित महिलेशी ऑनलाइन संपर्क करून आपण स्वतः इस्रोमध्ये वैज्ञानिक असल्याचे भासवून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला. तसेच पिडित महिलेला लग्नाचे आमिष दाखवून टप्प्याटप्प्याने तिच्याकडून वेगवेगळी कारणे सांगत ४२ लाख ६४ हजार ३२ रूपये घेतले. मात्र आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्या महिलेने सायबर क्राइम पोर्टलवर तक्रार केली. त्यामुळे आरोपीने उकळलेली १६ लाख ६४ हजार ३२ रुपयांची रक्कम तिला परत मिळाली. मात्र आरोपीने २७ लाख रुपयांची फसवणूक केली. वाकड पोलीस तपास करत आहेत.

# कुंजीरवाडी येथे विविध विकासकामांचे भूमिपूजन; ड्रेनेज व रस्त्यांच्या कामांना प्रारंभ

**थेऊर, ता. २ :** कुंजीरवाडी येथील थेऊरफाटा ते आंबेकरमळा-चौरेवस्ती दरम्यान अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला ड्रेनेज लाईनचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटकेयांच्या मार्गदर्शनाखाली या कामासाठी १० लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला असून, कामास मंगळवारी (ता. ०३) सुरुवात होणार आहे.

याचबरोबर धुमाळमळा परिसरातील अंतर्गत रस्त्याच्या काँक्रिटीकरणासाठीही १० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. दोन्ही विकासकामांचे भूमि पूजन उत्साहात पार पडले. दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नांवर तोडगा निघाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. जिल्हा परिषद




व पंचायत समिती निवडणुकीदरम्यान हवेली पंचायत समितीचे नवनिर्वाचित सदस्य युवराज हिरामण काकडे यांनी जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही जागा निवडून आल्यानंतर एका महिन्याच्या आत संबंधित कामे सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानुसार अवघ्या महिन्याभरात कामांना प्रत्यक्ष सुरुवात होत असल्याने ग्रामस्थांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.

या कार्यक्रमास जिल्हा परिषद सदस्या कोमल संदेश आव्हाळे, पंचायत समिती सदस्य युवराज काकडे, माजी सरपंच संतोष कुंजीर, सचिन तुपे, माजी उपसरपंच सुरेश कुंजीर, चंद्रकांत मेमाणे, दत्तात्रय कुंजीर, विकास निगडे, गोकुळ ताम्हाणे, शिवाजी कुंजीर, भरत निगडे, नयन तुपे, योगेश गायकवाड, दिपक ताम्हाणे, कैलास तुपे, पोलीस पाटिल मिलिंद कुंजीर, तंटामुक्ती अध्यक्ष बापूसो घुले, संभाजी गायकवाड, मुकेश गायकवाड, प्रकाश धुमाळ, नंदकुमार धुमाळ, दिलीप आंबेकर, विश्वनाथ गाढवे, सुभाष कुंजीर, रामदास कुंजीर, दादासो काकडे, संतोष शिंदे, अविनाश धुमाळ, स्वप्नील काळभोर, सोमनाथ धुमाळ, विकास धुमाळ, निर्मलाताई धुमाळ, गोरख तुपे, नवनाथ आंबेकर, विशाल धुमाळ, अमोल धुमाळ, सतीश कुंजीर, गौरव कुंजीर, अमर कुंजीर, संदीपआबा धुमाळ, बाबा धुमाळ, माऊली सावंत यांच्यासह विविध मान्यवर, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना संदेश आव्हाळे व युवराज काकडे म्हणाले, कुंजीरवाडी तसेच संपूर्ण जिल्हा परिषद गटातील गावांच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले.

पाणी, रस्ते, ड्रेनेज आदी मूलभूत सुविधांबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसून, टप्प्याटप्प्याने सर्व प्रलंबित कामे पूर्ण केली जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. दीर्घ प्रतीक्षेनंतर ड्रेनेज व रस्त्यांच्या कामांना सुरुवात होत असल्याने कुंजीरवाडीतील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे.

## वरवंड येथे एटीएम मशीनसह ८ लाखांचा मुद्देमाल लंपास

**यवत, ता. ३ :** पुणेसोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत असलेल्या वरवंड (ता. दौंड) येथे अज्ञात चोरट्यांनी थेट एटीएम मशीनच उचलून नेल्याची धाडसी घटना उघडकीस आली आहे. या चोरीत सुमारे ७ लाख ८३ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल लंपास करण्यात आला आहे.

सोमवारी (ता. ०२) बस स्टँडजवळ अब्दुल पटेल यांच्या खाजगी जागेतील पत्र्याच्या गाळ्यात बसविण्यात आलेले इंडिया वन कंपनीचे सुमारे ७० हजार रुपये किंमतीचे एटीएम मशीन अज्ञात व्यक्तींनी ओढून नेले. या मशीन मध्ये असलेली अंदाजे ७ लाख १३ हजार ३०० रुपयांची रोख रक्कमही चोरट्यांनी लंपास केली. या प्रकरणी इंडिया वन पेमेंटचे प्रतिनिधी धनंजय शिंदे यांनी यवत पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली असून अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# लोणीकंदचे माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर भुमकर व त्यांच्या मुलावर गुन्हा दाखल

**लोणीकंद, ता. २ :** कॉलेजच्या आर्थिक व्यवहारांबाबत जाब विचारण्याचे धाडस केल्यामुळे ६५ वर्षीय ज्येष्ठ शेतकऱ्यावर सख्ख्या भावाने आणि पुतण्याने बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना लोणीकंद (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील सगुणा बिल्डिंग येथे २८ फेब्रुवारीला दुपारी १ वाजण्याच्या सुमारास घडली आहे. याप्रकरणी लोणीकंदचे आदर्श सरपंच व माजी जिल्हा परिषद सदस्य शंकर रामचंद्र भुमकर आणि त्यांचा मुलगा सिद्धांत शंकर भुमकर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामुळे लोणीकंद परिसरात खळबळ उडाली असून, शिक्षण संस्थेतील आर्थिक व्यवहारांवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.



उद्धव रामचंद्र भुमकर (वय ६५, रा. लोणीकंद) असे जखमी झालेल्या शेतकऱ्याचे नाव असून पुण्यातील ससून रुग्णालयात उपचार सुरु आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भुमकर कुटुंबाच्या मालकीच्या बकोरी रोडवरील शिक्षण संस्थेत श्री. रामचंद्र एज्युकेशन सोसायटी अंतर्गत श्रीरामचंद्र कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग व डिप्लोमा कॉलेज चालवले जाते. या दोन्ही संस्थांचा कारभार उद्धव रामचंद्र भुमकर आणि भाऊ शंकर भुमकर पाहत असतानाही, आर्थिक व्यवहार मात्र शंकर भुमकर व त्यांचा मुलगा सिद्धांत हेच हाताळत होते.

कॉलेजमधील सीसीटीव्हीचा पासवर्ड बदलणे आणि महत्त्वाच्या फाईल्स गायब झाल्याबाबत फिर्यादी उद्धव भुमकर यांनी २८ फेब्रुवारी रोजी दुपारी सगुणा बिल्डिंग येथे जाऊन शंकर भुमकर आणि त्यांचा मुलगा सिद्धांत भुमकर यांना विचारणा केली असता, तू आम्हाला विचारणारा कोण? अशी दमदाटी करत शिवीगाळ सुरू झाली. त्यानंतर दोघांनी मिळून हाताने, लाथाबुक्क्यांनी तसेच कठीण वस्तूने छातीवर व पाठीवर जबर मारहाण केली. या घटनेवेळी पुतण्या पांडुरंग भुमकर, त्याची पत्नी स्वाती भुमकर आणि लक्ष्मी भुमकर यांनी मध्यस्थी करून मारहाण थांबवली. दरम्यान, या मारहाणीत फिर्यादी उद्धव भुमकर यांना नाक, तोंड, डोळे आणि शरीरावर ठिकठिकाणी दुखापत झाली आहे. त्यांना उपचारासाठी ससून रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी आरोपी शंकर रामचंद्र भुमकर (वय ५८) आणि सिद्धांत शंकर भुमकर (वय २५, रा. लोणीकंद) यांच्याविरुद्ध भारतीय न्यायसंहिता कलम ११८ (१), ११५ (२), ३५२, ३ (५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास लोणीकंद पोलीस करत आहेत.

## व्हीएसार च्या मालकाला अटक करा अन्यथा लढा उभारू

### आमदार अमोल मिटकरी

**पुणे,त आ. ३ :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी काल व्हीएसआर व्हेंचर्सचे मालक रोहित सिंग यांच्या संदर्भातला एक व्हिडिओ ट्वीट केला होता. त्यामध्ये रोहित सिंग हा वैमानिकाच्या बाजूला झोपलेला दिसत आहे. असाच बेजबाबदारपणा अजितदादांच्या विमाना अपघातावेळी झाला होता का? असा सवाल जय पवारांनी केला आहे.

जय पवारांच्या या शंकेचे राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनीही समर्थन केलं आहे. यासंदर्भात सरकारने व्हीएसआर व्हेंचरचा मालक रोहित सिंगला तात्काळ अटक करावी अशी मागणी केली आहे. यासोबतच



अधिक चौकशीसाठी डीजीसीएच्या अधिकाऱ्यांनाही सरकारने ताब्यात घ्यावं, अशी मागणी आमदार अमोल मिटकरी यांनी केली आहे. या संपूर्ण लढ्यात राष्ट्रवादीचे सर्व कार्यकर्ते जय पवार यांच्या सोबत असल्याचच आमदार मिटकरी म्हणाले. आम्ही सरकारमध्ये असलो तरी सरकारने रोहित सिंगला अटक न केल्यास राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते लढा उभारतील, असेही आमदार अमोल मिटकरी म्हणालेत.

# सोरतापवाडीत डिव्हायडरला दुचाकी धडकून ५१ वर्षीय मजुराचा मृत्यू

**उरुळी कांचन, ता. ३ :** पुणे - सोलापूर महामार्गावर भरधाव दुचाकी रस्ता दुभाजकाला (डिव्हायडर) धडकल्याने ५१ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. सोरतापवाडी (ता. हवेली) ग्राम पंचायत हद्दीतील देवकर एच.पी. पेट्रोलपंपाजवळ रविवारी (ता. ०१) दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास घडली.




जगन्नाथ शरणअप्पा रेड्डी (वय-५१, व्यवसाय मजुरी, मूळ रा. मगरवस्ती, आळंदी म्हातोबाची, ता. हवेली, सध्या रा. सोरतापवाडी, ता. हवेली असे अपघातात मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव असे आहे. याबाबत त्यांचा मुलगा अक्षय जगन्नाथ रेड्डी (वय-२४, व्यवसाय जमीन खरेदी-विक्री, रा. सदर) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अक्षय रेड्डी हे कुटुंबियांसमवेत एकत्रित राहणेस असून जमीन खरेदी विक्री चे काम करतात. तर त्यांची आई नर्सरी येथे काम करून व वडील मजुरी काम करून आम्ही आमचे कुटूंबाची उपजिवीका करतात. रविवारी दुपारी साडेतीन वाजण्याच्या सुमारास वडील जगन्नाथ रेड्डी हे देवकर एचपी पेट्रोलपंप, सोरतापवाडी येथून एमएच १२ डब्ल्यू एम ७४९९ क्रमांकाची स्प्लेंडर दुचाकीत पेट्रोल भरून कुंजीरवाडीच्या दिशेने जात असताना गाडीवरील नियंत्रण सुटले. दुचाकी रस्त्याच्या मधील डिव्हायडरला जोरात धडकल्याने जगन्नाथ रेड्डी गंभीर जखमी झाले.

स्थानिक नागरिक व पोलिसांच्या मदतीने त्यांना तात्काळ उरुळी कांचन येथील सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून उपचारापूर्वीच मृत घोषित केले. प्राथमिक तपासात दुचाकी भरधाव व निष्काळजीपणे चालवल्याने अपघात झाल्याचे समोर आले असून, अधिक तपास उरुळी कांचन पोलीस करत आहे. दरम्यान, याप्रकरणी रेड्डी यांच्यावर बीएनएस कलम १८१, १२५, (ब), १०६, ३२४(४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# रांजणगाव गणपती परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के; नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**योगेश मारणे**

शिरूर, ता. ३ : रांजणगाव गणपती परिसरात सोमवारी (ता. ०२) दुपारी सुमारे चार वाजण्याच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अचानक झालेल्या या कंपनांमुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अनेक नागरिक घाबरून घराबाहेर पडले, तर काहींना घरातील भांडी व इतर वस्तू हलल्याचा व घसरल्याचा प्रत्यक्ष अनुभव आला.

स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार, कंपनामुळे काही घरांच्या भिंतींवर सूक्ष्म तडे पडल्याचे दिसून आले. व्यावसायिक ओमकार शेळके यांनी सांगितले की, घरातील भांडी पडली आणि धक्का स्पष्ट जाणवला. सहकारी सोसायटीचे संचालक सुनील खेडकर यांनीही



भूकंप सदृश जोरदार धक्का बसल्याची प्रतिक्रिया दिली. शंकर सिंग ठाकूर यांच्या घराजवळील भिंतींवर तडे गेल्याचे दृश्य स्पष्ट दिसत असल्याचे स्थानिकांनी सांगितले. सुदैवाने, आतापर्यंत कोणतीही जीवितहानी किंवा जखमी झाल्याची नोंद झालेली नाही. मात्र, काही घरांना तडे गेल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. नुकसानग्रस्त घरांचे पंचनामे करून नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नागरिकांनी प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाकडून अद्याप भूकंपाची तीव्रता व केंद्रबिंदू याबाबत अधिकृत अहवाल जाहीर करण्यात आलेला नाही.

तहसीलदार बाळासाहेब म्हस्के यांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, कोणत्याही आपत्तीजन्य परिस्थितीत अफवांवर विश्वास न ठेवता स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा. परिस्थितीवर प्रशासनाचे बारकाईने लक्ष असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# लोणी काळभोर येथील मुळा मुठा नदीतील कचऱ्याला आग

## जनता धुरात, ग्रामपंचायती निर्धास्त; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ सुरु

> नदीपात्रातील कचरा जळत असून त्यातून निर्माण होणारा धूर नागरी वस्तीत पसरत आहे. या धुरामुळे विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि आधीपासून आजार असलेल्या रुग्णांना त्रास होऊ शकतो. विशेषतः मधुमेह, क्षयरोग (टीबी) व हृदयरोग असलेल्या रुग्णांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे. दूषित हवेमुळे संसर्गजन्य आजार तसेच त्वचारोग वाढू शकतात. नागरिकांनी शक्यतो मास्कचा वापर करावा. श्वास घेण्यास त्रास, डोळ्यांची जळजळ, खोकला किंवा इतर लक्षणे जाणवल्यास त्वरित दवाखान्यात जाऊन उपचार घ्यावेत. सर्वांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घ्यावी.
> - **डॉ. महबूब लुकडे,** आरोग्य अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणी काळभोर

> मुळामुठा नदीपात्र परिसरात मागील २४ तासांपासून फिरते हवा गुणवत्ता निरीक्षण केंद्र कार्यरत असून वातावरणातील हवेची सातत्याने पडताळणी केली जात आहे. या प्रकरणाबाबत गटविकास अधिकारी तसेच स्वच्छता व पाणीपुरवठा विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागविण्यात आला आहे. लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींना नोटिसा बजावण्यात आल्या आहेत. या प्रकारात दोषी आढळणाऱ्यांवर प्रशासनाच्या वतीने कठोर कारवाई करण्यात येईल.
> - **नवनाथ औताडे,** उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

**लोणी काळभोर, ता. ३ :** येथील मुळामुठा नदीपात्रात लागलेली आग मागील चार दिवसांपासून धुमसत आहे. आग विझविण्यासाठी एमआयटी प्रशासन व अग्निशामक दलाकडून शर्थीचे प्रयत्न सुरू असले तरी ती पूर्णपणे शमलेली नाही. विषारी धुराचे लोट परिसरात पसरत असून नागरिक व विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर त्याचा परिणाम होत आहे. एमआयटी शैक्षणिक संकुलातील ७० हून अधिक कर्मचारी अद्याप घटनास्थळी आग नियंत्रणासाठी कार्यरत आहेत. परंतु, लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्राम पंचायतींकडे कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध नसल्याने कचरा नदीपात्रात टाकला जात असल्याचा धक्कादायक प्रकार सोमवारी (ता. २ मार्च) उघडकीस आला आहे. त्यामुळे आग पुन्हा भडकण्याची शक्यता कायम असून परिसरात रोगराई पसरण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

लोणी काळभोर येथील मुळा-मुठा नदीपात्रात साचलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याला गुरुवारी (ता. २६ फेब्रुवारी) सकाळी साडेनऊच्या सुमारास क आग लागली. सुरुवातीला लहानशी घटना म्हणून दुर्लक्ष करण्यात आले; मात्र दिवसेंदिवस धूर वाढत गेला आणि परिस्थिती हाताबाहेर गेली. चार दिवस उलटूनही आग पूर्णपणे विझलेली नसून, आतून धुमसत राहिल्याने विषारी वायूचे लोट परिसरात पसरत आहेत. प्लास्टिक, रबर, वैद्यकीय व इतर मिश्र कचऱ्यामुळे निघणारा काळा, दाट धूर



नागरिकांच्या फुफ्फुसात घुसत आहे.

एमआयटी प्रशासन व अग्निशामक दलाचे कर्मचारी शर्थीचे प्रयत्न करत आहेत. सुमारे ७० हून अधिक कर्मचारी घटनास्थळी राबत असले तरी मूळ प्रश्न कायम आहे. नदीपात्रात एवढा कचरा साठलाच कसा? आणि तो जाळण्याची वेळच का आली? आग विझवण्याचे प्रयत्न सुरू असताना, धुरामुळे एमआयटी विश्वशांती गुरुकुलमधील पाच विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊन रुग्णालयात दाखल करावे लागले. सुदैवाने त्यांना डिस्चार्ज मिळाला; पण हजारो विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर निर्माण झालेल्या संकटाची जबाबदारी कोण घेणार?

परिस्थिती इतकी गंभीर झाली की, शनिवारी सुमारे हजार विद्यार्थ्यांना सुट्टी जाहीर करावी लागली. परिसरातील काही उद्योगसंस्थांनाही कामकाज बंद ठेवावे लागले. लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती परिसरातील अनेक नागरिकांना डोळ्यांची जळजळ, घसा बसणे, श्वासोच्छ्वासाचा त्रास, चक्कर येणे अशी लक्षणे जाणवत असल्याचे सांगितले जात आहे. वृद्ध, लहान मुले आणि आजारी नागरिकांसाठी हा धूर जीवघेणा ठरू शकतो, अशी भीती व्यक्त होत आहे.

देशपातळीवर नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारतचा नारा दिला, तर राज्यात देवेंद्र फडणवीस स्वच्छता मोहिमांसाठी निधी उपलब्ध करून देत असल्याचे सांगितले जाते. स्वच्छ नद्या, निरोगी भारत, हरित पर्यावरणया घोषणा केवळ पोस्टरपुरत्या राहिल्या आहेत का? लोणी काळभोरमधील वास्तव मात्र पूर्णपणे वेगळे चित्र दाखवत आहे. स्वच्छतेच्या नावाखाली जनजागृती केली जाते; पण प्रत्यक्षात ग्रामपंचायतींच्या हद्दीतून वाहणाऱ्या नदीतच कचरा टाकला जातोय, ही बाब संतापजनक आहे.

दरम्यान, लोणी काळभोर व कदमवाकवस्ती ग्रामपंचायतींकडे कचरा व्यवस्थापनासाठी अधिकृत जागा उपलब्ध नसल्याने कचरा अजूनही थेट नदीपात्रात टाकला जात आहे. आणि या नदीपात्रातील कचऱ्याला वारंवार आग लागण्याचे प्रकार यापूर्वीही घडले आहेत.

ही आग नैसर्गिक कारणांनी लागते की हेतुपुरस्सर लावली जाते, याची सखोल चौकशी व्हावी, अशी मागणी जोर धरत आहे. जर कचरा व्यवस्थापनासाठी योग्य सुविधा नसतील, तर त्या उभारण्याची जबाबदारी प्रशासनाचीच आहे. निष्काळजीपणामुळे नागरिकांच्या जीवाशी खेळ होत असेल, तर संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# किरकोळ कारणावरून तरुणाला मारहाण; महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल

**यवत, ता. ३ :** मस्करीत सुरू असलेल्या गप्पांवरून गैरसमज निर्माण झाल्याने तिघांनी दगडाने व लाथाबुक्क्यांनी तरुणाला म ारहाण केल्याची घटना उघडकीस आली. सहजपूर-माकरवस्ती येथे रविवारी (ता. ०१) रात्री पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास हि घटना घडली. याप्रकरणी यवत पोलीस ठाण्यात एका महिलेसह तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विजय प्रकाश चव्हाण (वय २७, रा. सहजपूर, माकरवस्ती, ता. दौंड) असे मारहाण झालेल्या तरुणाचे नाव आहे. चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, शिवाजी रोहीदास सोनकांबळे, लौकिक शिवाजी सोनकांबळे, व सुनिता शिवाजी सोनकांबळे (रा. सर्व सहजपुर, माकरवस्ती ता. दौंड) यांच्यावर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय चव्हाण हे रविवारी (ता. ०१) पाऊणे नऊ वाजण्याच्या सुमारास कामावरून घरी येत असताना त्यांचा चुलत भाऊ अमोल चव्हाण याच्यासोबत घराजवळ मस्करीत गप्पा सुरू होत्या. त्याच वेळी अचानक शिवाजी सोनकांबळे हा आला व ठतु मला शिवीगाळ का केली?' असे बोलला असता, चव्हाण म्हणाले, तुम्हाला काहीही शिवी दिली नसुन माझे आणी माझा भाउ अमोल यांच्यामध्ये मस्करीने भांडण चालु असुन मी त्याला मस्करीने शिवी दिली आहे असे सांगीतले असता सोनकांबळे यांनी शिविगाळ व दमदाटी करण्यास सुरवात केली.

वाद वाढत चालल्याने चव्हाण हे त्याच्या मोटारसायकलवरून निघत असताना लौकीक सोनकांबळे हा तेथे येऊन त्यांच्या अंगावर माती फेकली. ती माती डोळ्यात गेल्याने चव्हाण तोल जाऊन रस्त्यावर पडले. त्यानंतर लौकीक याने दगडाने डोक्यात मारून जखमी केले, तर शिवाजी सोनकांबळे व सुनिता सोनकांबळे यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, घटनेवेळी परिसरातील मित्रांनी मध्यस्थी करून भांडण सोडविले. डोक्याला दुखापत झाल्याने चव्हाण यांनी प्रथम ग्रामीण रुग्णालयात उपचार घेतले व त्यानंतर पोलिसांत तक्रार दाखल केली. याप्रकरणी तिघांवर भा.न्या.स. कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास यवत पोलीस करीत आहेत.

# लोणी स्टेशन येथील हातभट्टीच्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा; रोहन शुक्लासह ९ जणांना अटक

**लोणी काळभोर, ता. ३ :** लोणी स्टेशन (ता. हवेली) येथील अवैध हातभट्टी विक्रीच्या ठिकाणी लोणी काळभोर पोलिसांनी शनिवारी (ता.२८) सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास छापा टाकला आहे. या छाप्यात पोलिसांनी ९ जणांना अटक केली आहे तर १ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत सर्व अवैध धंदे बंद असल्याचा दावा केला जात असताना हा अड्डा सुरू असल्याची चर्चा नागरिकांमध्ये रंगली होती. मात्र, पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे कोणत्याही बेकायदेशीर धंद्याला पाठबळ दिले जात नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

सागर मल्हारी कसबे (वय-३०, रा. कवडीपाठ, टोलनाका, कवडीगांव ता. हवेली, जि. पुणे), दत्तात्रय नवनाथ मोहोळकर (वय-५३, रा. गल्ली नं. ७, घोरपडेवस्ती, ता.हवेली, जि. पुणे), समाधान श्रावण कांबळे (वय-३८, रा. इराणी गल्ली, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे), राजु विष्णु बाविस्कर (वय-३५, लोणी स्टेशन ता. हवेली. जि.पुणे), विजु किशन गोठे (वय-३०, रा. आग्रेवस्ती, लोणीकाळभोर, ता. हवेली. जि.पुणे), निलेश दशरथ ससाणे (वय-३५, , रा. आग्रेवस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली), म ातादीन जयराम जाटन (वय-४५, रा. पालखी स्थळ, कदमवाकवस्ती, ता. हवेली, जि. पुणे), सर्जेराव विठ्ठल दुभाडे (वय-५३, रा. इराणीवस्ती, प्यासा हॉटेलजवळ, कदम




वाकवस्ती, ता. हवेली. जि.पुणे) व रोहन शुक्ला (रा.लोणीस्टेशन ता. हवेली जि.पुणे) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंम लदार महेंद्र भगवान आगळे यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, लोणी स्टेशन येथील विश्वराज हॉस्पिटलशेजारी पत्र्याचे शेडमध्ये एक इसम हातभट्टी दारूची अवैध विक्री करत आहे. अशी माहिती पोलिसांना मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला तेव्हा त्या ठिकाणी बरेच इसम दारू पिण्यासाठी थांबलेले आढळून आले. तर ८ जण काळया रंगाच्या प्लास्टिक पिशव्यामधुन हातभट्टी दारू हातात घेवुन पित असताना सापडले.

दरम्यान, लोणी काळभोर पोलिसांनी या कारवाई १ हजार ५० रुपयांची १५ लिटर हातभट्टी दारू जप्त केली आहे. तर ९ जणांवर महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ॲक्ट कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करून अटक केली आहे. लोणी काळभोर परिसरात अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी कडक भूमिका घेतली असून अशा बेकायदेशीर धंद्यांविरुद्ध यापुढेही कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

ही कामगिरी लोणी काळभोर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र पन्हाळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अरुण जाधव, पोलीस हवालदार अशोक नळे, रामहरी वणवे, महेश करे, पोलीस अंमलदार महेंद्र आगळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे. लोणी काळभोर पोलिसांच्या या कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# उरुळी कांचन येथील उन्नती कन्या विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात संपन्न

**उरुळी कांचन, ता. ३ :** उन्नती कन्या विद्यालयात राष्ट्रीय विज्ञान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. इंटिग्रेटेड एक्झिबिशन फॉर होलेस्टिक एज्युकेशन. या थीमअंतर्गत विद्यार्थिनींनी आपल्या सर्वांगीण विकासाचे दर्शन घडवले शारीरिक, मानसिक, भावनिक व सामाजिक दृष्टीने शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मादेवी विडप यांच्या संकल्पनेतून संचालिका नयॉन सुरेश कांचन व अध्यक्षा डॉ. नुपूर सुरेश कांचन यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून एमआयटी स्कूल ऑफ एज्युकेशन अँड रिसर्चच्या प्रोफेसर डॉ. दिव्या नायर उपस्थित होत्या. विद्यार्थिनींच्या अभ्यासक्रमातील विज्ञान प्रकल्प, मराठी राजभाषा दिनाच्या विषयाचे तसेच विविध इतर शैक्षणिक प्रकल्पांनी शाळेतील प्रत्येक कोपरा सजवला.

विद्यार्थिनींच्या विज्ञान प्रयोगांचे प्रदर्शन आणि वैज्ञानिक प्रात्यक्षिकांमुळे बालवैज्ञानिकांची जिज्ञासा उजागर झाली. याशिवाय मनोरंजक विज्ञान दालन, गणितीय संकल्पना स्पष्ट करणारे दालन, हिंदी व मराठी भाषेवरील प्रकल्प आणि आपल्या सणांचे महत्त्व दर्शवणारे प्रदर्शन या सर्वांनी कार्यक्रमाची शोभा वाढवली. आर्ट अँड क्राफ्ट विभागात चिमुकल्यांनी साकारलेल्या कलात्म क चित्र व वस्तू पाहुण्यांना आकर्षित करीत होत्या.

विद्यार्थिनींच्या सृजनशीलतेला वाव देणारे हे सर्व प्रकल्प मोठ्या उत्साहाने सादर केले गेले. प्रत्येक प्रकल्पाबद्दल विद्यार्थिनींनी प्रेक्षकांना थेट माहिती दिली, ज्यामुळे पालकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. विज्ञान शिक्षिका संयोजिता मुगळे आणि इतर विषय शिक्षकांचे मार्गदर्शन यशस्वी ठरले. दरम्यान, शाळेच्या या आगळ्यावेगळ्या विज्ञान दिन उत्सवाने सर्वसमावेशक एकात्मिक शिक्षणाचे महत्त्व पालकांसमोर प्रभावीपणे मांडले आणि विद्यार्थिनींम ध्ये सृजनशीलता व आत्मविश्वास वाढवण्यास मदत केली.

# दौंड तालुक्यात नवीन मुठा उजवा कालव्याचे गेट फोडून पाणी वळवले

## शासकीय मालमत्तेची तोडफोड केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**यवत, ता. ३ :** नवीन मुठा उजवा कालव्यावरील गेटचे वेल्डिंग व साखळीचे कुलूप तोडून अज्ञात व्यक्तींनी कालव्याचे पाणी बेकायदेशीररीत्या वळविल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या घटनेमुळे सिंचन व्यवस्थेत अनियमितता निर्माण होऊन शासकीय मालमत्तेचे नुकसान केल्याप्रकरणी अज्ञातावर यवत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी अर्चना रावसाहेब कुलांगे (वय ३३, शाखा अधिकारी, पाटबंधारे विभाग उरुळी कांचन, रा. उरुळी कांचन वसाहत, ता. हवेली, जि. पुणे) यांनी यवत पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध सरकारी तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात




आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी अर्चना कुलांगे या पाटबंधारे विभाग उरुळी कांचन येथे शाखा अधिकारी म्हणून कार्यरत असून, नवीन मुठा उजवा कालवा कि.मी. ४३ ते ५४ या हद्दीतील पाहणी, पाणीपट्टी व्यवस्थापन व सिंचन नियंत्रणाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. गुरुवारी (ता. २६ फेब्रुवारी) दुपारी सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास गस्त घालीत होत्या.

यावेळी बिटधारक गजानन डोंबाळे व स्थानिक अभियंता ओंकार हराळे यांच्यासह कालव्याची गस्त घालत असताना, कासुर्डी (ता. दौंड) येथील भोंडवेवस्ती येथे कि.मी. ६१/०९० वरील अतीवाहक गेटची पाहणी केली यावेळी अज्ञात व्यक्तीने गेटचे वेल्डिंग तोडून साखळीचे कुलूप तोडले होते. गेटची तोडफोड करून कालव्याचे पाणी शेजारील ओढ्यात वळविण्यात आले होते.

दरम्यान, सदर प्रकारामुळे कालव्याच्या पाणी वितरण व्यवस्थेत अनियमितता निर्माण झाली असून शासकीय मालमत्तेचे नुकसान झाले आहे. कोणतीही अधिकृत परवानगी न घेता पाणी वळविण्यात आल्याने या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीसांकडून सुरू आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## चेहऱ्यावरील पिंपल्सचे डाग नाहीसे करण्यासाठी फक्त एकच उपाय कडुलिंब

वयात येताना बहुतांशी मुलींच्या चेहऱ्यावर पिंपल्स येतात. हे पिंपल्सचे डाग नाहीसे करण्याासाठी नानाविध रासायनिक उत्पादने आज बाजारात उपलब्ध आहेत. परंतु पिंपल्सच्या डागांवर कडुलिंब हा सर्वात उत्तम पर्याय मानला जातो. कडुलिंबाच्या झाडाचे सर्व भाग, त्याची पाने, फुले, फळे, मुळे आणि साल आरोग्यासाठी खूप उपयोगी आहे.

प्राचीन काळापासून जळजळ, संसर्ग, ताप, त्वचारोग आणि दंत समस्यांवर उपचार करण्यासाठी कडुलिंबाचा वापर होत आला आहे. कडुलिंबाची पाने कडू असतात. परंतु ही पाने आपल्या त्वचेसाठी रामबाण आहेत. कडुलिंबाची पाने रक्तातील साखरेचे व्यवस्थापन करण्यासाठी देखील खाल्ली जातात. या पानांच्या समृद्ध औषधी गुणधर्मांमुळे, कडुलिंबाचा वापर अनेक उत्पादने आणि औषधांमध्ये केला जातो. ते डाग, मुरुमे आणि संसर्ग यासारख्या त्वचेच्या विविध समस्या दूर करण्यास मदत करते.

कडुलिंबाची पाने आणि त्यातील घटकांमध्ये रोगप्रतिकारक-सम ायोजित, दाहक-विरोधी, उच्च रक्तदाबविरोधी, अल्सर-विरोधी, मलेरियाविरोधी, अँटीफंगल, अँटीबॅक्टेरियल, अँटीव्हायरल आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात.

त्वचेला मऊ मुलायम ठेवण्यासाठी आणि मुरुमांपासून मुक्तता मि ळवण्यासाठी हा उपाय करायलाच हवा. कडुलिंबाची पाने बारीक करा आणि थोडी मुलतानी माती, चिमूटभर हळद, चंदन पावडर, गुलाबजल आणि थोडी कोरफड घालून फेस पॅक बनवा. हा फेस पॅक आठवड्यातून दोनदा लावावा. २० ते २५ मिनिटे ठेवल्यानंतर, तुमचा चेहरा स्वच्छ करा आणि मॉइश्चरायझर लावा. हा फेस पॅक काही दिवसांत चांगले परिणाम देतो.

कडुलिंबाची साल दगडावर घासून, गुलाबपाण्यात मिक्स करावी. हे मिश्रण मुरुम किंवा डाग असलेल्या ठिकाणी लावावे. पुरळ किंवा बारीक मुरुम यांसारखे त्वचेचे संक्रमण कमी करण्यास देखील ते उपयुक्त आहे. त्वचेला खाज येत असेल तर कडुलिंबाच्या सालीची पेस्ट देखील लावता येतो.

स्वस्थ त्वचा राखण्यासाठी, मूठभर कडुलिंबाची पाने पाण्यात उकळा, ते गाळा आणि नंतर कोमट झाल्यावर त्या पाण्याने आंघोळ करा. यामुळे तुमची त्वचा चेहऱ्यापासून ते हातपायांपर्यंत निरोगी राहील. यामुळे खरुज आणि खाज यासारख्या समस्यांचा धोका खूपच कमी होतो.

वारंवार मुरुमे येत असतील तर तुम्हाला त्वचेशी संबंधित समस्या येऊ शकतात. जर तुमच्या चेहऱ्यावर डाग असतील तर तुम्ही दररोज सकाळी रिकाम्या पोटी ३-४ कडुलिंबाची पाने चावू शकता. हे रक्त शुद्ध करते, नैसर्गिकरित्या चमकणारी त्वचा प्रदान करते आणि त्वचा देखील स्वच्छ करते.

# थेऊर येथील पूनावाला स्टड फार्ममध्ये धारदार शस्त्राच्या धाक दाखवून चंदन चोरी

**लोणी काळभोर, ता. ३ :** थेऊर (ता. हवेली) येथील नामांकित पूनावाला स्टड फार्म येथे कर्मचाऱ्यांना धारदार शस्त्राचा धाक दाखवत चंदनाची झाडे चोरून नेल्याची धक्कादायक घटना शनिवारी (ता. २८) पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास घडली. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

याप्रकरणी परमेश्वर हिरामन कोळी (वय ४१, रा. जिल्हा परिषद शाळेच्या मागे, लोणी काळभोर, ता. हवेली, जि. पुणे) यांनी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार चार अज्ञात इसमांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सन १९४६ साली स्थापन झालेला हा स्टड फार्म देशातील अव्वल दर्जाच्या शर्यतीच्या घोड्यांच्या पैदाशीकरिता प्रसिद्ध आहे. उच्च वंशावळीच्या घोड्यांचे संगोपन, प्रशिक्षण व प्रजनन यासाठी हा फार्म ओळखला जातो.



पूनावाला ग्रुपकडून या फार्मचे कामकाज पाहिले जाते. देखभाल व दुरुस्तीसाठी येथे १० ते १५ कर्मचारी कार्यरत आहेत.

फिर्यादी परमेश्वर कोळी हे या स्टड फार्ममध्ये सिक्युरिटी सुपरवायझर म्हणून कार्यरत आहेत. शनिवारी (ता. २८) पहाटे सव्वाचार वाजण्याच्या सुमारास चार अनोळखी इसम स्टड फार्मच्या गेटजवळ आले. सुरक्षा रक्षकांनी त्यांना अडवण्याचा प्रयत्न केला असता, अज्ञात चोरट्यांनी सिक्युरिटी गार्ड कुंदन शर्मा, सरजित सिंग आणि इंद्रजित गुप्ता यांना मारहाण केली. तसेच एका सुरक्षा रक्षकाला पकडून ठेवत धारदार शस्त्राचा धाक दाखवून जिवे मारण्याची धमकी दिली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे कर्मचारी घाबरले आणि आरोपींना आत प्रवेश मिळाला. त्यानंतर आरोपींनी फार्म परिसरातील सुमारे ८० हजार रुपये किंमतीची चार चंदनाची झाडे कापली. त्या झाडांचे ओंडकेवाहनात टाकून आरोपी पसार झाले. दिवसाढवळ्या घडलेल्या या धाडसी चोरीमुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात चार अज्ञात चंदनचोरांविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३०९(६) व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दिगंबर सोनटक्के करीत आहेत.

## मुरलीधर मोहोळांकडून जय पवारांच्या व्हिडिओची दखल

**पुणे, ता. ३ :** राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेवारीला झालेल्या अपघातात अजित पवारांसह ५ जणांचा मृत्यू झाला. या घटनेनं देशरात शोककळा पसरली. याच अपघातासंदर्भात अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी एक व्हिडीओ शेअर करत शंका उपस्थित केली होती.

तसेच विमान कंपनीचा बेजबाबदारपणा सांगणारा पुरावा जगासमोर आणला होता. दरम्यान, आता या व्हिडिओची दखल नागरी हवाई उड्डाण मंत्रालयाकडून घेण्यात आलीय. त्यासंदर्भात बोलताना हवाई उड्डाणमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी, जय पवार यांनी शेअर केलेला व्हिडिओ मी पाहिला आहे. मी तो व्हिडिओ पाहिला आहे, योग्य ती दखल घेतली जाणार, असे मंत्री मोहोळ यांनी म्हटले.

# सोरतापवाडीत दुचाकी चोरांचा धुमाकूळ; घरासमोरून तीन मोटारसायकली लंपास

**उरुळी कांचन, ता. ३ :** सोरतापवाडी परिसरात घरासमोर उभ्या असलेल्या दुचाकी चोरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला असून अवघ्या चार दिवसांत तीन मोटारसायकली लंपास केल्याच्या घटना समोर आल्या आहेत. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

सोरतापवाडी (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील लोणकरमळा परिसरात गुरुवारी (ता. २६) मध्यरात्री घरासमोर उभ्या असलेल्या एकाच मालकाच्या ५५ हजार किमतीच्या दोन मोटारसायकली अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्या. तर यापूर्वी सोमवारी (ता. २३) सोरतापवाडी हद्दीतील चिंतामणी पार्क परिसरातून ७० हजार किमतीची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी पळवून नेली. याप्रकरणी विश्वनाथ




रामचंद्र आढाळगे (वय ५०, व्यवसाय मजुरी, रा. लोणकरमळा, सोरतापवाडी, ता. हवेली) यांच्या दोन मोटारसायकली चोरीस गेल्या आहेत. तसेच विठ्ठल अभिमान कांबळे (रा. चिंतामणी पार्क, सोरतापवाडी, ता. हवेली) यांची दुचाकी चोरीस गेल्याप्रकरणी उरुळी कांचन पोलीस ठाणे येथे अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी आढाळगे यांनी दोन मोटारसायकली खरेदी केल्या होत्या. त्यापैकी एक मोटारसायकल ते स्वतः वापरत होते, तर दुसरी त्यांचा मुलगा वापरत होता. बुधवारी (ता. २५) रात्री सुमारे ९ वाजता दोन्ही मोटारसायकली घरासमोर पार्क करून ठेवण्यात आल्या होत्या. त्या वेळी गाड्यांना लॉक करण्यात आले नव्हते.

रात्री कुटुंबीय जेवण करून झोपले. मात्र मध्यरात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास मुलगा आकाश याने वडिलांना उठवून दोन्ही मोटारसायकली गायब झाल्याचे सांगितले. त्यानंतर कुटुंबीयांनी परिसरात शोध घेतला; मात्र कोणताही शोध लागला नाही.

मोटार सायकल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरी करून नेले असले बाबत लक्षात आल्याने उरुळी कांचन पोलीस ठाण्यात २० हजार रुपये किमतीची एक हिरो कंपनीची एचएफ डीलक्स नंबर MH १२ MU ६३४१ व ३५ हजार रुपये किमतीची एक हिरो कंपनीची पेंशन प्रो MH १२ RU ११५४ या वर्णनाचे एकूण ५५ हजार रुपये किमतीच्या ०२ मोटार सायकल चोरून नेल्या आहेत.

दरम्यान, विठ्ठल कांबळे यांनी एम एच १२ डब्ल्यु एस ८८१७ नंबरची दुचाकी घराचे समोर हॅन्डल लाक करून पार्क केली होती. सकाळी कामाला जाणेकरीता निघाले. यावेळी जागेवर दिसून आली नाही. आजूबाजूला शोध घेल्ता मात्र मिळून आली नाही. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांच्या विरोधात उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सुरु आहे.




## महाविकास आघाडीचा राज्यसभेचा उमेदवार ठरला?

**मुंबई, ता. ३ :** देशासहित राज्यातील राजकीय पक्षांना राज्यसभा निवडणुकीचे वेध लागले आहेत. महाविकास आघाडीला राज्यसभा निवडणुकीत एक जागा जिंकण्याची संधी आहे. महाविकास आघाडीकडून शरद पवारांना राज्यसभेवर पाठण्याचे निश्चित झाल्याचं सांगण्यात येतंय. काँग्रेस पक्षाकडून हिमाचल प्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणामध्ये स्थानिक उमेदवारांना राज्यसभा तिकीट देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रात महाविकास आघाडीला एकच जागा जिंकण्याची संधी आहे. या जागेवर शरद पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झालाय असं म्हटलं जातंय. एप्रिल महिन्यात शरद पवार, प्रियंका चतुर्वेदी, फौजिया खान, रामदास आठवले, भागवत कराड, रजनी पाटील आणि धैर्यशील पाटील यांचा राज्यसभेच्या खासदारकीचा कार्यकाळ संपणार आहे.राज्यसभेतील ७ जागांसाठी अर्ज करण्यासाठी ५ मार्च अंतिम तारीख आहे. तर निवडणूक १६ मार्च रोजी होणार आहे. त्यानंतर त्याच दिवशी मतमोजणी होणार आहे.




## लाडक्या बहिणींचे पैसे येत्या ४ दिवसात जमा होणार?

**मुंबई, ता. ३ :** लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिला या फेब्रुवारीच्या हप्त्याची वाट पाहत आहेत. जानेवारीचा हप्ता लांबणीवर गेला त्यानंतर फेब्रुवारीचा हप्ता कधी येणार असा प्रश्न विचारला जात आहे. दरम्यान, अजूनही महिलांच्या खात्यात पैसे जमा न झाल्याने महिलांच्या मनात निराशा निर्माण झाली आहे. दरम्यान, आता फेब्रुवारीच्या हप्त्याची संभाव्य तारीख समोर आली आहे. फेब्रुवारीचा हप्ता लांबणीवर गेला आहे. मार्च महिन्यात महिलांच्या खात्यात पैसे जमा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. ८ मार्च रोजी महिला दिन साजरा केला जातो. त्या दिवशी महिलांच्या खात्यात पैसे जमा केले जाण्याची शक्यता आहे. राज्य सरकार ६ मार्च रोजी अर्थसंकल्प सादर करणार आहे. यामध्ये योजनेबाबत तरतुद केली जाऊ शकते. यानंतर लगेचच महिलांच्या खात्यात पैसे जमा केले जाऊ शकतात. त्यामुळे येत्या ४ दिवसात महिलांच्या खात्यात पैसे येतील, असं बोललं जात आहे. याबाबत कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही. मात्र, लवकरच घोषणा केली जाण्याची शक्यता वर्तवण्यात येतीय.

## इराणवर मोठा हल्ला बाकी; अमेरिकेची पूर्ण ताकद अजून वापरलीच नाही : डोनाल्ड ट्रम्प

**नवी दिल्ली, ता. ३ :** इस्त्रायल-अमेरिका आणि इराण यांच्यातील युद्धाचा आज तिसरा दिवस असून, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला आतापर्यंतचा सर्वात भीषण इशारा दिला आहे. इराणवर अद्याप सर्वात मोठा हल्ला होणे बाकी आहे, असे स्पष्ट करत ट्रम्प यांनी येणाऱ्या काळात युद्धाची तीव्रता प्रचंड वाढणार असल्याचे संकेत दिले आहेत.



सीएनएनला दिलेल्या विशेष मुलाखतीत ट्रम्प म्हणाले की, अमेरिकेने अद्याप आपली पूर्ण लष्करी ताकद वापरलेली नाही. येणाऱ्या दिवसांत ही लष्करी कारवाई अधिक वेगवान आणि आक्रमक होईल. आमच्याकडे जगातील सर्वात शक्तिशाली लष्कर आहे आणि आम्ही आता त्याचा पूर्ण ताकदीने वापर करत आहोत, असे ट्रम्प यांनी सांगितले.

या युद्धाच्या धामधुमीत ट्रम्प यांनी आपला जुना मित्र देश असलेल्या ब्रिटनवर उघडपणे नाराजी व्यक्त केली आहे. ब्रिटीश पंतप्रधान कीर स्टार्मर यांनी हिंदी महासागरातील आपला लष्करी तळ डिएगो गॉर्सिया अमेरिकेला वापरण्यासाठी देण्यास उशीर केल्याने ट्रम्प संतापले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, युद्धाच्या पहिल्याच दिवशी अमेरिका या तळावरून इराणवर हल्ला करू इच्छित होती. मात्र, ब्रिटनने याला परवानगी देण्यास ४८ तासांचा विलंब लावला. इतकेच नाही तर, या तळावरून केवळ इराणच्या क्षेपणास्त्र तळांनाच लक्ष्य करण्याची अट ब्रिटनने घातली आहे. ब्रिटनच्या या भूमिके मुळे अमेरिकेच्या युद्ध रणनीतीमध्ये अडथळा निर्माण झाला असून, मी ब्रिटीश पंतप्रधानांच्या या निर्णयामुळे अत्यंत निराश आहे, अशा शब्दांत ट्रम्प यांनी आपली नाराजी व्यक्त केली आहे.



## आदर्श कॉलेज ऑफ फार्मसी, विटा येथे विरासत अंतर्गत वार्षिक दिन उत्साहात साजरा

**विटा, ता. ३ :** आदर्श कॉलेज ऑफ फार्मसी, विटा येथे विरासत वार्षिक सांस्कृतिक महोत्सवांतर्गत वार्षिक दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कलाविष्कार सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर समूह नृत्य, एकल नृत्य, संगीत नाट्य, फॅशन शो तसेच विविध मनोरंजक सादरीकरणांद्वारे विद्यार्थ्यांनी आपल्या कला व कौशल्यांचे प्रभावी प्रदर्शन केले. प्रत्येक सादरीकरणास प्रेक्षकांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. वार्षिक दिनाच्या निमित्ताने महाविद्यालयातील शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रम शिस्तबद्ध व रंगतदार पद्धतीने पार पडला. या कार्यक्रमाचे नियोजन व आयोजन महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रभारी डॉ. स्वाती पाटील यांनी प्राचार्य डॉ. एन. एस. महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली केले. कॅम्पस डायरेक्टर मा. पुजा पाटील यांनी विद्यार्थ्यांच्या उत्कृष्ट सादरीकरणाचे कौतुक करून अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात व व्यक्तिमत्त्व विकासात भर पडते, असे मत व्यक्त केले. वार्षिक दिनानिमित्त महाविद्यालय परिसरात आनंद व उत्साहाचे वातावरण अनुभवायला मिळाले.

# भिगवण उपबाजारात नव्या ज्वारीला उच्चांकी दर

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ३ : इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार भिगवण येथे नव्या ज्वारीला प्रति क्विंटल ६ हजार १०१ रुपयांचा उच्चांकी दर मिळाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. रविवारी (ता. १) भुसार मार्केटमध्ये ज्वारी, गहू व हरभरा या शेतमालाची आवक सुरू झाली असून ज्वारीच्या दराने बाजारात सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे.




दिपक मचाले यांच्या आडतीवर आलेल्या ज्वारीची खरेदी महावीर वडुजकर यांनी ६ हजार १०१ रुपयांच्या दराने केली. सध्याच्या बदलत्या बाजारस्थितीत ज्वारीला मिळालेला हा दर शेतकऱ्यांसाठी उत्साहवर्धक ठरला आहे. भिगवण उपबाजारात शेतमालाची विक्री उघड लिलाव पद्धतीने होत असून चोख वजनमाप, पारदर्शक व्यवहार आणि विक्रीनंतर तातडीने हिशोबपट्टी व रक्कम अदा केली जाते. त्यामुळे शेतकऱ्यांचा बाजार समितीवरील विश्वास अधिक दृढ झाला आहे.

उपबाजारात ६० मेट्रिक टन क्षमतेचा वे-ब्रिज तसेच राशीन रोडलगत बाजार आवारात १०० मेट्रिक टन क्षमतेचा वे-ब्रिज २४ तास उपलब्ध आहे. या सुविधेमुळे शेतकऱ्यांना अचूक वजन व तत्काळ व्यवहाराचीसोयहोते. मकाशेतमाल-ाचे दर घटल्याने इंदापूर बाजारसमितीने हमीभाव दराने मका खरेदी केंद्र सुरू केले आहे. या निर्णयामुळे मका उत्पादक शेतकऱ्यांना आधार मि ळाला असून बाजार समितीच्या या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या विविध योजना, हमीभाव खरेदी केंद्रे व पारदर्शक लिलाव प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके आणि माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांनी केले आहे.

# कर्जाचा हफ्ता मागण्यासाठी गेलेल्या फायनान्स कर्मचाऱ्याला मारहाण

## सासवड पोलीस ठाण्यात दोघांवर गुन्हा दाखल

**सासवड, ता. २ :** कर्जाच्या हप्त्याची चौकशी करण्यासाठी गेलेल्या फायनान्सच्या कर्मचाऱ्याला कुऱ्हाडीच्या दांड्याने बेदम मारहाण करीत कोयत्याने मारून टाकतो अशी धमकी दिल्याची घटना घडली आहे. सासवड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील इनामके मळा परिसरात हि घटना घडली. याप्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिलींद महादेव इनामके, अक्षय महादेव इनामके (दोन्ही रा. इनामकेमळा, सासवड ता. पुरंदर, जि. पुणे) असे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी तन्मय अनिल काळे व्यवसाय - इक्वीटास स्मॉल फायनान्स बँकेमध्ये नोकरी, रा. ४९५ नवजिवन सोसायटी, सहकार नगर नं -१ प्द्मावती, सासवड, ता. पुरंदर) यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी काळे हे बँकेकडून कर्ज घेतलेल्या ग्राहकांकडून हप्ते वसूल करण्याचे काम करतात. हडपसर ते पुरंदर दरम्यानच्या ग्राहकांची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. २१ फेब्रुवारी रोजी सकाळी सुमारे अकरा वाजता ते सासवडकडे निघाले होते. दुपारी अडीच वाजता तो अक्षय इनामके यांच्या घरी हप्त्याबाबत चौकशीसाठी गेले होते.

इनामके यांनी हुंडाई एलॅन्ट्रा




(MH १२ PC ६२२६) या कारचे कर्ज घेतले असून हप्ता थकीत होता. मात्र, घरी भेटलेल्या त्यांच्या भावाने मिलिंद महादेव इनामके आमच्याकडे अशी गाडी नाही असा दावा केला. यानंतर फोनवर अक्षय इनामके यांच्याशी संपर्क साधण्यात आला. त्यांनी सध्या केरळमध्ये असल्याचे सांगत दोन दिवसांत हप्ता भरण्याचे आश्वासन दिले.

प्रकरण वाढले आणि मिलिंद इनामके यांनी बँकेच्या कलेक्शन मॅनेजरशी फोनवर वाद घालत असताना संतापाच्या भरात काळे यांच्या कानशिलात लगावली. त्यानंतर गोठ्यातील कुऱ्हाडीच्या दांड्याने पाठ, कंबर, मांड्या, पोटरी, घोटे आणि उजव्या हाताच्या मनगटावर बेदम मारहाण करण्यात आली. तुला कोयत्यानेच मारून टाकतो अशी धमकीही देण्यात आली.

फोनवरून वरिष्ठ अधिकारी विनवण्या करत असतानाही मारहाण सुरूच असल्याचे सांगितले जाते. अखेर शाखा व्यवस्थापक कपिल दिलीप पोमण यांच्या हस्तक्षेपानंतर काही वेळाने कर्मचाऱ्याला सोडण्यात आले. जखमी काळे यांना तत्काळससून रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मोबाईलमधील रेकॉर्ड केलेल्या कॉन्फरन्स कॉलमध्ये अक्षय इनामके यांनी त्याला सोडू नको, धरून ठेव असे सांगितल्याचेही समोर आले आहे.

दरम्यान, या घटनेनंतर पीडित कर्मचाऱ्याने सासवड पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पुढील तपास सुरू आहे. पुढील तपास सासवड पोलीस करीत आहेत.